महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

## -: आदेश :-

क्र.पोमसं/२/१०२०/नि.सु.२४-२५/(सहा.समादेशक)/१९५/२०२४

दिनांक :- २९/०७/२०२५

**संदर्भ** :- शासन आदेश, गृह विभाग, क्र. एच.डी.११०१७/१४/२०२५/एक/पोल-१ अ, दिनांक २८/०७/२०२५ (प्रत संलग्न)

**विषय** :- सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक पदावर पदोन्नतीने पदस्थापना.

* * * * *

सशस्त्र पोलीस उपअधीक्षक / सहायक समादेशक पदावर पदोन्नती देण्यासाठी पात्र सशस्त्र पोलीस निरीक्षकांच्या सन २०२४-२५ च्या निवडसूचीवरील १९ अधिकाऱ्यांच्या पदोन्नतीवरील पदस्थापनेबाबतचे संदर्भाधिन शासन आदेश याद्वारे कळविण्यात येत आहेत :-

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की,

I. उपरोक्त शासन आदेशांत नमूद केलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे व त्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्यात यावी.

II. पदोन्नती प्राप्त सशस्त्र पोलीस निरीक्षकांच्या नावांसमोरील नमूद सध्याच्या नियुक्ती ठिकाणी काही बदल झालेला असेल तरी सदर अधिकारी सध्या ज्या ठिकाणी कार्यरत असेल त्या घटक प्रमुखांनी अशा पोलीस निरीक्षकास त्यांच्या नावासमोरील नमूद पदोन्नतीवरील पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होण्यासाठी कोणत्याही प्रतिक्षेविना तात्काळ कार्यमुक्त करावे.

III. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १५ डिसेंबर, २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदींचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिकाऱ्यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरूध्दच्या प्रलंबित / प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

१) शिक्षा प्रस्तावित / चालू झाली असल्यास

२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास

३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास

४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

IV. ज्या ठिकाणाबाबत कोणत्याही मा.न्यायालयाचे, मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचे काही विशिष्ट आदेश असतील परंतु त्याठिकाणी सदर आदेशान्वये पदस्थापना झाली असेल तर अशा मा.न्यायालयीन आदेशाची अवमान्यता होणार नाही याचीही दक्षता घेण्यात यावी. अशी प्रकरणे उद्‌भवल्यास त्यांचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

V. निवडणूकीची आदर्श आचार संहितेचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**मा.पोलीस महासंचालकांनी सर्व पदोन्नत अधिकाऱ्यांना पदोन्नतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.**

**( सुप्रिया पाटील यादव )**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल (राज्य आपत्ती प्रतिसाद दल, नागपूर व धुळे सह)
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, राज्य राखीव पोलीस बल, नानवीज-दौंड

प्रत सविनय सादर :-

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, दुसरा मजला मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-३२
**(लक्षवेध :- मृणाल सावंत,** कक्ष अधिकारी, पोल १अ)
महालेखाकार-१ (लेखा व अनुज्ञेयता) / महालेखाकार-२ (लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई /नागपूर.

प्रत :-

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (सस्नेह)
सर्व संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी
कार्यासन अधिकारी, का. क्र. २-अ, ९, १४अ, ३२, ३६, ४०
संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस निरीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. सदरचे आदेश www.mahapolice.gov.in या वेबसाईटवर सशस्त्र पोलीस निरीक्षक ते सशस्त्र पोलीस उपअधीक्षक / सहायक समादेशक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना या शिर्षाखाली पुढील ३० दिवसासांठी प्रसिध्द करण्यात यावेत.

**<u>नियमित निवडसूची २०२४-२५</u>:**
***“सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/ सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल”*** **या संवर्गातील पदावर पदोन्नतीने पदस्थापना करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**शासन आदेश क्र.एच.डी.११०१७/१४/२०२५/एक/पोल-१अ.**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.
दिनांक : २८ जुलै २०२५.

**<u>संदर्भ</u> :**
१) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्या.-१२, दिनांक ०१.०८.२०१९.
२) शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१.
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/२/नि.सू.२४-२५(सहा.समादेशक)/१९५/२०२४, दि.०८.०५.२०२५, दि.१६.०५.२०२५, दि.१०.०६.२०२५.
४) शासन पत्र, गृह विभाग, क्र.रापोसे-०२२५/प्र.क्र.४४/पोल-१अ, दि.३०.०५.२०२५, दि.१२.०६.२०२५.

**<u>शासन आदेश</u>.**

*“सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल”* या संवर्गातील पदावर पदोन्नती देण्याकरिता तयार करण्यात आलेल्या *"सशस्त्र पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल"* या संवर्गातील अधिका-यांच्या *"नियमित निवडसूची २०२४-२५"* यामध्ये समाविष्ट असलेल्या, पुढील तक्त्यातील स्तंभ (२) मध्ये नमूद पोलीस अधिका-यांना *“सशस्त्र पोलीस उप अधीक्षक/सहायक समादेशक, राज्य राखीव पोलीस बल”* या संवर्गातील पदावर, तात्पुरत्या स्वरुपात, पुढील अटींवर, पदोन्नती देण्यात येत असून त्यांची स्तंभ (३) मध्ये निर्दिष्ट पदावर, याद्वारे, पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे-

| अ.क्र. (१) | अधिकाऱ्याचे नाव (श्री./श्रीम.) (२) | पदोन्नतीने पदस्थापना (३) |
|---|---|---|
| १. | अकबर मुसा शेख | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१४, छत्रपती संभाजीनगर |
| २. | तल्लुर महांतेश शिवपुत्रप्पा | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१६, कोल्हापूर |

| अ.क्र. (१) | अधिकाऱ्याचे नाव (श्री./श्रीम.) (२) | पदोन्नतीने पदस्थापना (३) |
|---|---|---|
| ३. | सावळाराम कृष्णा अरोंदेकर | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१०, सोलापूर |
| ४. | विठ्ठल पिराजी नरवाडे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१२, हिंगोली |
| ५. | पिंताबर कोंडू ठाकरे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.११, नवी मुंबई |
| ६. | बाळासाहेब रखमा कोरडे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.२, पुणे |
| ७. | अंकुश गुला भिल | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.६, धुळे |
| ८. | महादु शंकर धराडे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१, पुणे |
| ९. | शंकर हिरामण पवार | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१२, हिंगोली |
| १०. | वामन बंकट चव्हाण | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.८, मुंबई |
| ११. | रविंद्र चंद्रकांत कांबळे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१६, कोल्हापूर |
| १२. | राजेश माणिक जाधव | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.४, नागपूर |
| १३. | गोरख विश्वनाथ गायकवाड | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.७, दौंड |
| १४. | प्रदीप नामदेव तांगडे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१०, सोलापूर |
| १५. | अरुण सदाशिव उमासरे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.८, मुंबई |
| १६. | विकास काशीनाथ साळवे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.७, दौंड |
| १७. | उत्तम कृष्णा गायकवाड | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.७, दौंड |
| १८. | संजय बळवंत कांबळे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१६, कोल्हापूर |
| १९. | मोतीराम कान्होजी शेंद्रे | सहायक समादेशक, रा.रा.पोलीस बल, गट क्र.१७, चंद्रपूर |

अटी:-

१) उक्त पदोन्नती ही विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ या प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णय व आदेश यांच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

२) उक्त पदोन्नती ही शा.नि., सा.प्र. विभाग, क्र.बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७.०५.२०२१, यास आव्हान देण्यात आलेल्या प्रकरणात मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

३) उक्त पदोन्नती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी यांना नियमाधीनतेचा *(regularization)* व सेवाज्येष्ठतेचा *(seniority)* कोणताही हक्क असणार नाही.

२. त्या अनुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण/न्यायालय यांचे आदेश, कायदा व सुव्यवस्था, इत्यादी लक्षात घेऊन पुढील उचित कार्यवाही करावी.

३.	हा शासन आदेश, सामान्य प्रशासन विभागच्या मान्यतेने आणि पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांच्या शिफारशीचा यथायोग्य विचार करुन, महाराष्ट्र पोलीस अधिनियम (१९५१ चा २२) याच्या कलम २२न मध्ये निर्दिष्ट सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

४.	हा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०७२८१८३७०४९२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VENKATESH MADHAV BHAT

Digitally signed by VENKATESH MADHAV BHAT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=5f0272b97156a5d2812bad6725ca46fb2671d1da08208cfdd6677fac0afd6bf2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=6E277C9088A4CB8B53E535A4642A6800B908C5DBDB3A63175760874EBA717AE1, cn=VENKATESH MADHAV BHAT
Date: 2025.07.28 18:38:46 +05'30'

**(व्यंकटेश भट)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री, गृह (शहरे/ग्रामीण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत-**

१) अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा. पोलीस बल
३) समादेशक, रा.रा. पोलीस बल (सर्व गट).
४) संबंधित पोलीस अधिकारी *(पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, यांच्यामार्फत).*
५) निवड नस्ती, पोल-१अ.

प्रत-

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.